प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. 17.06.2019**

**उलवे नदीच्या परिवर्तीत चॅनलची**
**सिडकोच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी केली पाहणी**

आज दि. २९ जून, २०१९ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाभा क्षेत्रातील उलवे नदीच्या परिवर्तीत चॅनलची **श्री. लोकेश चंद्र**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी पाहणी केली. उलवे नदीच्या 3.2 कि.मी. लांबीच्या परिवर्तित केलेल्या चॅनेलचे कार्यान्वयन कशाप्रकारे होत आहे याची पाहणी श्री. लोकेश चंद्र यांनी यावेळी केली. उलवे नदीचा प्रवाह वळविण्याचे काम सिडकोतर्फे नुकतेच यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे.

या प्रसंगी **श्री. आर. बी. धायटकर**, मुख्य अभियंता (नमुंआंवि), सिडको; **श्री. प्रणित मूल**, अधिक्षक अभियंता (विमानतळ-३), सिडको; **श्री. पी. डी. काटकर**, सहाय्यक कार्यकारी अभियंता (विमानतळ-४), सिडको; **श्री. भरणीकुमार** (मे. टीआयपीएल-जेएमएम जेव्ही) आणि **श्री. दादासाहेब सूर्यवंशी** (मे. केतन कन्स्ट्रक्शन हेही उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासारखा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील व पनवेल तालुक्यातील दहा गावांतील जमीन संपादित करून आकारास येत आहे. सिडकोतर्फे जीव्हीके प्रणित नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. या सवलतधारक कंपनीस विमानतळ उभारणीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

विमानतळ क्षेत्रात एप्रिल, २०१७ पासून सिडकोतर्फे विकासपूर्व कामांना सुरूवात करण्यात आली आहे. विकासपूर्व कामांमध्ये उलवे टेकडीचे सपाटीकरण, उलवे नदीचा प्रवाह वळविणे, उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्या भूमिगत करणे यांचा समावेश आहे. सिडको आणि सवलतधारक कंपनी यांच्यात झालेल्या नोव्हेशन करारानंतर विमानतळ गाभा क्षेत्राचे हस्तांतरण सिडकोतर्फे सवलतधारक कंपनीस करण्यात आले आहे. यामुळे सद्यस्थितीत गाभा क्षेत्रातील विकासपूर्व कामे सवलतधारक कंपनीमार्फत पार पाडण्यात येत आहेत.

सदर विकासपूर्व कामांपैकी उलवे नदीचा प्रवाह वळविणे हे तुलनेने एक महत्त्वाचे व आव्हानात्मक काम होते. विमानतळ परिसराजवळील गावांमध्ये पावसाळ्यात उद्भवणारी पूरसदृश परिस्थिती टाळण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनां विषयी शिफारसी करताना केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन, पुणे यांनी उलवे नदीचा प्रवाह बदलण्याची शिफारस केली होती. त्यानुसार उलवे नदीचा प्रवाह वळविण्याचे काम हाती घेण्यात आले होते.

गाभा क्षेत्रातील 96 मी. उंचीच्या डोंगराचे सपाटीकरण करून त्याला झीरो लेव्हलवर आणून त्या जागेतून 3.2 कि.मी. चा मार्ग (चॅनेल) काढून उलवे नदीचा प्रवाह वळविण्यात आला आहे.

उलवे नदीचा प्रवाह वळविण्यात आल्याने विमानतळ गाभा क्षेत्राभोवतालच्या गावांमध्ये पावसाळ्याच्या काळात निर्माण होणारा पुरसदृश परिस्थितीचा धोका आता पूर्णतः टळला आहे. उलवे नदीचा प्रवाह वळविणे हे काम नियोजित वेळेत व यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या जडणघडणीतील एक महत्वाचा टप्पा पार पडला असून सिडको महामंडळासाठी ही महत्वाची उद्दिष्टपूर्ती आहे. अशाच गतीने सर्व विकासपूर्व कामे पूर्ण झाल्यानंतर या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या निर्मितीस वेग प्राप्त होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**